"2077"

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** नंदुरबार शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0848 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**31/10/2023 00:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | १७० |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 27/10/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 30/10/2023
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/10/2023 **Time (वेळ):** 00:09 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/10/2023 00:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** नंदुरबार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** देवला सोमा वळवी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा रनाळे खुर्द, पोस्ट भादवड,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा रनाळे खुर्द, पोस्ट भादवड,नंदुरबार,नंदुरबार शहर,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जयेश शंकर तेजी | | | 1. ग्रामिण रुग्णालय नंदुरबार, नंदुरबार ,नंदुरबार शहर,नंदुरबार, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10000 | 10,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी, देवला सोमा वळवी, वय-55 वर्ष, व्यवसाय-बसचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, आगार नंदुरबार, मुळ रा. रनाळे खुर्द, पोस्ट भादवड, ता.जि. नंदुरबार. मो.न. 8605782620.

समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी पत्नी येणाबाई तसेच एक मुलगा सुरेशानंद व एक मुलगी निषा अशांसह राहतो. मी गेल्या 22 वर्षापासून एस.टी. महामंडळ येथे चालक या पदावर कार्यरत आहे. मी सन-2017 साली सांगली जिल्हयातून नंदुरबार बस आगारात बदली करुन हजर झालेलो आहे.

दिनांक 05/05/2023 रोजी मी नंदुरबार-नाशिक-नंदुरबार बसवर ड्युटी सुरु असतांना नाशिकवरुन नंदुरबारकडे येत◌ाना पिंपळनेर येथे मी चालवत असलेल्या बसचा अपघात झाला होता. त्यावेळी माझे डावे पायास दुखापत झाल्याने, मी पिंपळनेर येथील शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार घेतला होता. त्यानंतर तेथील डॉक्टरांनी मला सिव्हील हॉस्पिटल, नंदुरबार येथे पुढील उपचार घेणेबाबत सल्ला दिला होता. त्यानंतर मी घरी आल्यावर पिंपळनेर येथील डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या-औशधे घेऊन घरीच आराम केला होता. दिनांक 08/05/2023 रोजी डॉक्टरांचे सल्ल्यानुसार सिव्हील हॉस्पिटल, नंदुरबार येथे जाऊन केस पेपर काढुन औशधोपचार केला होता व त्यानंतर मी आमचे डेपो मॅनेजर श्री. पवार साहेब यांना माझे पायाचे दुखापतीबाबत सांगून मेडीकल रजेवर सुटलो होतो.

त्यानंतर मला बरे वाटत असल्याने तसेच माझे पायाची दुखापत बरी झाल्याने मला कर्तव्यावर हजर व्हावयाचे असल्याने मला सिव्हील हॉस्पिटल येथून फिटनेस सर्टिफिकेटची आवश्यकता आहे, याकरीता मी माझा मित्र संजय वळवी यांना दि.26/10/2023 रोजी संपर्क साधला असता त्याने सांगितले की, सिव्हील हॉस्पिटल येथील त्यांचे ओळखीचे असलेले लिपीक श्री. जयेष तेजी य◌ांचा मला फोन येईल व ते फिटनेस सर्टिफिकेट काढून देतील, असे सांगितले होते.

त्यानंतर दिनांक 26/10/2023 रोजी दुपारी 03◌:47 वा मला सिव्हील हॉस्पिटल येथील लिपीक श्री. जयेष तेजी यांचा त्यांचे मोबाईल फोन क्रम◌ांक 9595957880 वरुन माझे मोबाईल फोन क्रमांक 8605782620 वर फोन आला. फोनवर त्यांनी मला सिव्हील हॉस्पिटल येथून फिटनेस सर्टिफिकेट काढुन देतो असे सांगितले व आधार कार्ड, पॅन कार्ड, तसेच माझे संपूर्ण नाव व पत्ता घेऊन येणेबाबत सांगितले. तसेच माझेकडुन मला सिव्हील हॉस्पिटल येथून फिटनेस सर्टिफिकेट काढुन देण्याचे मोबदल्यात 10,000/- ते 12,000/-रुपये खर्च येईल असे सांगितले. त्यांना मी सदर पैसे हे शासकीय फि आहे अगर कसे? बाबत विचारपुस केली असता त्यांनी मला सांगितले की, तुम्ही कोणाही कडे जा फिटनेस सर्टिफिकेट काढुन देण्यासाठी तेवढे पैसे द्यावेच लागतील, त्याशिवाय फिटनेस सर्टिफिकेट मिळणार नाही. लिपीक श्री. तेजी हे सांगत असलेला खर्च ही कोणतीही शासकिय फि नसून ती लाचच आहे, बाबत माझी खात्री झालेली आहे. त्यांचेत व माझेत कोणतेही पुर्ववैमनस्य किंवा वादविवाद नसून उधार उसनवारीचा व्यवहार नाही. मला त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दिनांक 27/10/2023 रोजी तक्रार देण्यासाठी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथे समक्ष आलो.

त्यानंतर मी दिनांक 27/10/2023 रोजी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथे लेखी तक्रार पंच क्र. 01 श्री. राजेंद्र आत्माराम बागले व पंच क्र. 02 श्री. मारोती संभाजीराव कान्होळे यांचेसमोर दिली. त्यानंतर आपण आम्हास अ◌ॅन्टी करप्शन ब्युरोमध्ये तक्रार आल्यानंतरची क्रियारीती व कार्यवाहीचा क्रम समजावून सांगितला. त्यानंतर पोनि वाप मंडप य◌ांनी मला व दोन्ही पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची सविस्तर माहिती दिली व प्रात्याक्षिक करुन दाखविले.

त्यानंतर लोकसेवक श्री. जयेष तेजी यांनी मला भेटण्यासाठी नगरपालिका समोरील चहाचे हॉटेलवर बोलाविलेले असल्याने आपण मला व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं.1 श्री. बागले यांचेसह नगरपालिका समोरील चहाचे हॉटेलवर पाठवुन लिपीक श्री.तेजी यांची भेट घेवुन त्यांची पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. सदर ठिकाणी मी सिव्हील हॉस्पिटल येथील लिपीक श्री. तेजी य◌ांचेशी माझे कामाचे संबंधाने बोलणी केली चर्चेदरम्यान लिपीक



Scanned with CamScanner

श्री. तेजी यांनी कामाचे मोबदल्यात प्रत्येक महिन्याचे 2,000/- असे 06 महिन्याचे एकूण 12,000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी तडजोड केली असता प्रत्येक महिन्याचे 1800/- याप्रमाणे 10,800/- रुपये अशी लाचेची मागणी करून तडजोडीअंती शेवटी 10,000/- रुपये लाचेची मागणी केलेली आहे. तसेच माझे व लिपीक श्री.तेजी यांचेतील बोलणे हे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाले असुन ते आपण व दोन्ही पंचांनी ऐकुन खात्री केली. याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.
त्यानंतर लिपीक श्री.तेजी यांनी सोमवारी म्हणजे दिनांक 30/10/2023 रोजी पैसे देणेबाबत सांगितल्याने दिनांक 30/10/2023 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आले होते. त्यानंतर दिनांक 30/10/2023 रोजी मी 11:00 वा अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथे हजर झालो होतो. तेव्हा यापूर्वी पडताळणी कारवाईच्या वेळी बोलाविण्यात आलेले पंच क्र.01 श्री.बागले व पंच क्र. 02 श्री. कान्होळे हे अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथे हजर झाले होते.
पोनि वाघ मॅडम यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोनि/वाघ मॅडम यांनी पंचासमक्ष माझेकडे लिपीक श्री.तेजी यांना देण्याकरीता लाचेची मागणी केलेले पैसे 10,000/- रुपये हजर करण्यास सांगितले असता, मी माझे शेतीच्या उत्पन्नाचे बचतीतून आणलेले 10,000/- रुपये आपल्यासमोर हजर केले. त्यात 500/-रु. दराच्या 20 चलनी नोटा होत्या. त्यांचे क्रमांक नोंदविण्यात आले. त्यानंतर पोनि वाघ मॅडम यांचे सुचनेवरुन पोना/नावाडेकर यांनी सदर नोटांना पांढऱ्या रंगाची पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करुन दाखविले. तसेच सदर पावडरचे नाव अॅन्थ्रासिन पावडर असल्याचे मला सांगितले. तद्नंतर पोनि वाघ मॅडम यांचे सूचनेवरुन पोना/नावाडेकर यांनी पंचासमक्ष लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून सदर रक्कम माझे पॅन्टचे उजवे खिशात ठेवली. त्यानंतर मला शर्टाच्या बाह्या फोल्ड करण्याचा लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा करणेबाबत व सदर इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास सापळा पथक रंगेहात पकडतील, असे सांगण्यात आले.

त्यानंतर पोनि/वाघ मॅडम यांनी मला, पंच नं. 1 श्री बागले, पंच नं. 2 श्री. कान्होळे तसेच सर्व पोलीस स्टाफ अशांना पुन्हा सापळा कार्यवाहीबाबत महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर आपण मला लिपीक श्री. तेजी यांना फोनव्दारे संपर्क साधुन कोठे भेटायाचे? याबाबत विचारपुस करणेस सांगितले. त्यानंतर आपले सुचनेवरुन पोहवा/ठाकरे यांनी व्हॉईस रेकॉर्डमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनव्दारे श्री. तेजी यांचे मोबाईल फोनवर संपर्क केला असता त्यांनी देसाई पेट्रोलपंप, पिथषकी सागर चौक, नंदुरबार येथे येणेबाबत सांगितले व पैसे सोबत घेऊन येणेबाबत कळविले. त्यानंतर पोनि/वाघ मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आपले ताब्यात घेतले.

त्यानंतर पुन्हा मला, पंच नंबर 01 व 02 तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार येथील स्टाफ यांना सुचना दिल्या. त्यानंतर पोनि वाघ मॅडम यांनी आपले ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर पोहवा/ठाकरे यांचेकडे दिले. पोहवा/ठाकरे यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर माझे गळ्यातील तुळशीमाळेस बांधुन सुरु केले, त्यानंतर पंच न.1 श्री.बागले व मला लोकसेवक लिपीक श्री.तेजी यांना लाचेची रक्कम देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, नंदुरबार येथून देसाई पेट्रोलपंप, षष्ठीसागर चौक, नंदुरबार येथे दुपारी02:00 वाजेच्या सुमारास पंच नंबर 01 श्री.बागले यांचे दुचाकी वाहनाने रवाना केले. आमचे पाठोपाठ आपण,पंच नंबर 02 व स्टाफ असे पोनि वाघ मॅडम यांचे खाजगी वाहनाने रवाना झाले. तसेच देसाई पेट्रोलपंपाचे परिसरात दबा धरुन थांबून राहीले.

मी व पंच नं.01 श्री.बागले असे देसाई पेट्रोलपंप येथे गेलो असता लिपीक श्री. तेजी यांची मी भेट घेतली व कामाचे संबधाने चर्चा केली. तेव्हा लिपीक श्री. तेजी यांनी माझेकडून पैश्यांची मागणी केली. तेव्हा मी श्री. तेजी यांना सर्टीफिकेट बनवून देणारे डॉक्टर यांना फोन करण्यास सांगितले. तेव्हा मी श्री.तेजी यांना डॉक्टरांचे नाव विचारले असता त्यांनी वसावे डॉक्टर यांना फोन केला असे सांगितले. फोनवर सर्टीफिकेट बनवून देणारे डॉक्टर यांचेशी श्री. तेजी यांनी हिंदीत संभाषण केले. संभाषणादरम्यान श्री. तेजी यांनी पैसे भेटले आहेत, असे सांगितले त्यानंतर श्री. तेजी यांनी माझेकडे पैश्यांची मागणी केली असता, मी माझे पॅन्टचे उजवे बाजूचे खिशातून उजव्या हाताने पैसे काढून 10,000/- रुपये श्री.तेजी यांचेसमोर धरले असता लिपीक श्री.तेजी यांनी लाचेची 10,000/-रु.रोख रक्कम ही त्याचे उजव्या हाताने स्वीकारुन हातात धरले व पैसे मोजले. त्यादरम्यान लाच स्विकारलेबाबत मला यापूर्वी ठरवून दिलेला माझे शर्टाच्या बाह्या फोल्ड करण्याचा इशारा केला असता श्रीमती वाघ मॅडम, पंच नं.2 श्री कान्होळे व त्यांचे सापळा पथकाने लोकसेवक लिपीक श्री. तेजी यांना पंच साक्षीदारांसमक्ष पकडून अटकावून ठेवले. त्यानंतर लिपीक श्री. तेजी यांना पोनि वाघ मॅडम यांनी स्वतःची ओळख देऊन त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.जयेश शंकर तेजी, वय-40 वर्ष, व्यवसाय-सफाईगार, ग्रामीण रुग्णालय धानोरा, जि. नंदुरबार असे सांगितले.



Scanned with CamScanner

त्यानंतर मला समजले की, श्री जयेष तेजी हे लिपीक नसून सफाईगार असून ते ग्रामीण रुग्णालय धानोरा, जि. नंदुरबार येथे नोकरीस असल्याचे समजले. आपण, लोकसेवक श्री. तेजी, पंच नंबर 01 व पंच नंबर 02 अशांसह देसाई पेट्रोलपंप येथील रुममध्ये गेले. त्यानंतर अॅन्थ्रासिन पावडरचे प्रात्याक्षिक करुन आपण मला अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे जाण्यास सांगितले. मी त्यानंतर अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे आलो. त्यानंतर आपण व आपला स्टाफ असे श्री.तेजी यांचे फोनवर बोललेले इसम श्री. तुकाराम भिला भोई, वय-43, व्यवसाय-खाजगी चालक, रा. भोईगल्ली, नवनाथ टेकडीजवळ, नंदुरबार यांना पेट्रोलपंप जवळ बोलावून त्यांची विचारपुस करुन ताब्यात घेऊन अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालय येथे आले. तेव्हा सदर ठिकाणी मला समजले की, श्री. तेजी हे फोनद्वारे बोललेले इसम हे डॉक्टर नसून खाजगी इसम आहेत.

यापूर्वी श्री तेजी यांनी ते सिव्हील हॉस्पिटल, नंदुरबार येथे लिपीक असल्याचे सांगितले होते. त्यानंतर मला आता आपणाकडून ते धानोरा ग्रामीण रुग्णालय येथील सफाईगार असल्याचे मला समजले आहे. तसेच माझे व तेजी यांचे फोनवरील संभाषणादरम्यान मला डॉक्टर वसावे यांचेशी बोललो असे सांगून खाजगी इसम श्री.तुकाराम भोई यांचेशी फोनवर बोलून मला मेडीकल फिटनेस सर्टीफिकेट बनवून देण्याचे मोबदल्यात 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रुपये लाच पंचांसमक्ष स्विकारली.

तरी दिनांक 27/10/2023 रोजी नगरपालिका बिल्डींगचे समोरील बाजुस असलेल्या चहाच्या हॉटेलवर श्री. जयेष षंकर तेजी, वय- 40 वर्ष, व्यवसाय-सफाईगार, ग्रामीण रुग्णालय धानोरा, जि. नंदुरबार यांनी मला श्री. तेजी हे सिव्हील हॉस्पिटल, नंदुरबार येथील लिपीक असल्याचे सांगून फिटनेस सर्टीफिकेट काढुन देण्याचे मोबदल्यात 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. मागणी केलेली लाचेची रक्कम दिनांक 30/10/2023 रोजी 02○:04 ते 02○:42 वाचे सुमारास देसाई पेट्रोलपंप, विघ्नहर्ती सागर चौक, नंदुरबार येथे स्विकारली. तसेच माझे व लोकसेवक श्री. तेजी यांचे पडताळणी व यशस्वी कारवाई दरम्यानचे संभाषणात फोनद्वारे बोललेले श्री. तुकाराम भिला भोई हे खाजगी इसम असून देखील सिव्हील हॉस्पिटल येथील डॉक्टर असल्याचे सांगितले. याकरीता त्यांना पंचसाक्षीदारांसमक्ष पकडण्यात आलेले असून श्री.जयेष षंकर तेजी, वय-40 वर्ष, व्यवसाय-सफाईगार, ग्रामीण रुग्णालय धानोरा, जि.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

Nivrutti Gangaram Pawar(I (Inspector)) /

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**No.**(क्र.):

**Rank** (पद):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकारी अंमलदार)
**Name**(नाव): ... Gangaram F
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** नंदुरबार

**P.S. (पोलीस ठाणे):** नंदुरबार शहर

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 030
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 31/10/2023 13:34 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** NivruttiGangaramPawar /पोलीस निरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

यावेळी आम्ही पोनि/माधवी वाघ,ला.प्र.वि.नंदुरबार नोंद करतो कि, नंदुरबार शहर पोस्टे गुन्हा रजि.नं. 848/2023भ.प्र. अधिनियम 1988चे कलम 7(अ) व भादवि कलम 170प्रमाणे दाखल गुन्हयातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचा अनुषंगाने आरोपी लोकसेवक जयेश शंकर तेजी वय 40वर्ष धंदा-सफाईगार ग्रामिण रुग्णालय धोनोरा जि.नंदुरबार व 2) खाजगी इसम तुकाराम भिला भोई वय 43 धंदा चालक रा. भोईगल्ली नवनाथ टेकडी नंदुरबार यांच्यावर यशस्वी लाचेचा सापळा कारवाई करण्यात आली. असुन त्यांना 10,000/-रुपये लाच स्विकारल्याने पंचासमक्ष पकडण्यात आलेले आहे. या बाबत दिनांक 31/10/2023 रोजी 00.09 वाजता नंदुरबार शहर पोस्टे येथे गुरनं 848/2023 भ्र.प्र.अधि.कलम 7(अ) व भादवि कलम 170प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान गुन्हयात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 12 हे वाढीव कलम लावणे आवश्यक आहे.

तरी नंदुरबार शहर पोस्टे गुन्हा रजि.नं. 848/2023भ.प्र.अधिनियम 1988चे कलम 7(अ) व भादवि कलम 170 प्रमाणे दाखल गुन्हयांस भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 12 हे वाढीव कलम लावण्यास विनंती आहे.

7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

विशेष नोंद.

8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

पोलीस ठाणे अंमलदार
नंदुरबार शहर पो.स्टे.

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** Nivrutti Gangaram Pawar
**Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):**

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 31/10/2023

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**
**Name (नाव):** Nivrutti Gangaram Pawar
**Rank (पद):** I (Inspector)



Scanned with CamScanner